प्रकरण सहावे.

## समारोप

या प्रबंधामध्यें निपाणीतील ग्राहक सहकारी संस्थानी निपाणीमध्यें जीवनावश्यक वस्तूंचा केलेल्या पुरवठयाचा अभ्यास केला आहे. तथ्य संकलनासाठी प्रामुख्याने प्रत्येक संस्थेकडील काही वर्षाचे अहवाल नोंदणीपत्रक यांचा वापर करण्यात आला आहे. तसेच काही माहिती या संस्थांचे चिटणीस व खाजगी व्यापारी यांच्याशी केलेल्या प्रत्यक्ष चर्चेतून उपलब्ध झाली. प्रबंधाला आवश्यक असणारी काही संख्याशास्त्रीय माहिती, निपाणी नगरपालिका, चिक्कोडी तहशीलदार कचेरी, बेळगांव जिल्हा सहकारी विभाग यांच्याकडून मिळवण्यात आली आहे.

प्रस्तुत विषय ग्राहक सहकारी चळवळीला अनुसरून असल्याने त्यात प्रथम सहकारी चळवळ आणि नंतर ग्राहक सहकारी चळवळीचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे. मानवी जीवनाच्या अनेक क्षेत्रातीमध्ये सहकारी चळवळीचा प्रभाव पडल्याचे आढळते. परंतु हा प्रभाव समान पध्दतीने पडल्याचे दिसत नाही. सहकारी चळवळीची सुरवात ग्राहक चळवळीतून झालेली असली तरी सर्वच देशात ग्राहक सहकारी चळवळीचा विकास झाल्याचे आढळत नाही. भारतात तर सहकारी पतपुरवठा, सहकारी शेती, सहकारी विपनन यांच्या तुलनेत ग्राहक सहकारी चळवळीकडे दुर्लक्ष झाले आहे असेम्हंटले तर त्यात वावगे ठरणार नाही. १८४४ मध्ये रॉशडेल संस्थेतून सुरू झालेली ग्राहक चळवळ २० व्या शतकापर्यंत जितकी वाढायला हवी होती तितकी ती वाढलेली नाही. नव्याने मांडण्यात आलेल्या ग्राहकवादाच्या संकल्पनेतून ग्राहक हितरक्षण व ग्राहकाचे शोषण याबाबत जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न झाला आहे. परंतु या प्रयत्नांची व्याप्ती अजुन मर्यादित आहे.

या पार्श्वभूमीवर निपाणी या कर्नाटक महाराष्ट्र राज्यांच्या सीमा रेषेवर असलेल्या निमशहरी गावात ग्राहक सहकारी चळवळीची व्याप्ती कितपत वाढली आहे. हे जाणून घेण्यासाठी निपाणीतील प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थाचा

अभ्यास या प्रबंधात करण्यात आला आहे. त्यामध्ये सुरवातीला निपाणीतील प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांनी केलेली कामगिरी तपासताना त्यांची स्थापना त्यांची उद्दिष्टे, सभासदत्व, भाग भांडवल, खेळते भांडवल व खरेदी विक्री व्यवहार हे निकष लावले आहेत. त्यातुन मिळालेल्या माहितीवरून व आकडेवारीवरून निपाणीतील प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थाबाबत पुढील निष्कर्ष निघतात.

१) निपाणीतील १९८१ च्या शीरगणतीनुसार असलेली लोकसंख्या ४४७८३ आहे. पण या लोकसंख्येच्या मानाने ग्राहक सहकारी संस्थाची संख्या ४ म्हणजे अत्यंत कमी आहे. जवळजवळ ११,१९६ ग्राहकामागे एक संस्था असे हे प्रमाण पडते.

२) निपाणीतील लोकसंख्येतील कामगार वर्गाची संख्या लक्षात घेतल्यास निपाणीतील ग्राहक सहकारी संस्थांची सभासद संख्याही कमी आहे. १९८६-८७ मध्ये सर्व संस्थांच्या एकंदर भागधारकांचे निपाणीच्या लोकसंख्येशी असणारे प्रमाण ६.६६ टक्के होते. तसेच एकुण क्षेत्रफळाच्या दृष्टिनेही ग्राहक सहकारी संस्थाची व्याप्ती फारशी वाढलेली नाही.

३) निपाणीतील ग्राहक सहकारी संस्था, येथील नागरिकांना जीवनावश्यक वस्तुमध्ये तांदुळ, गहू, रॉकेल, पामतेल साखर यासारख्या वस्तु, स्वस्तदरात ग्राहकांना पुरविण्याच्या हेतुने स्थापन झाल्या असल्या तरी हे उद्दिष्ट पूर्ण करण्यात त्या संस्था सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील एक प्रतिनिधी म्हणूनच प्रामुख्याने काम करतात.

४) निपाणीच्या एकुण जीवनावश्यक वस्तूंच्या मागणीचा विचार केला तर ग्राहक संस्थानी या मागणीला अनुसरून केलेल्या पुरवठयाचे प्रमाण इतर स्वस्त धान्य दुकाने व व्यापारी यांच्या तुलनेत कमी आहे.

५) ग्राहक संस्थांच्याकडे असणाऱ्या भागधारकाची संस्था म्हणावी तितकी समाधानकारक नाही. १९७७-७८ मध्ये या संस्थाच्या भाग धारकांची संख्या ११३० होती. तर १९८६-८७ मध्ये ही संख्या ३००० झाली. तसेच ग्राहक सहकारी संस्थानी १० वर्षात उभारलेले भाग भांडवल हे खेळत्या भांडवलाच्या तुलनेत अत्यंत अल्प आहे.

आणि विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे या ग्राहक सहकारी संख्या आपले भागधारक सभासद पाठविण्यासाठी स्वत:हून फारसे प्रयत्न करीत नाहीत असे दिसते. आणि दुर्दैवाची गोष्ट म्हणजे संस्थेचे सभासदत्व देताना जाती धर्माचा विचार करण्यात येतो हे एकंदर सहकारी चळवळीच्या विकासाच्या दृष्टिने घातक आहे.

६) देशातील एकंदर चलनवाढ लक्षात घेता १९७७-७८ ते १९८६-८७ या १० वर्षाच्या कालावधीत निपाणीतील ग्राहक संस्थाच्या खरेदी विक्री व्यवहारात उल्लेखनीय वाढ झालेली नाही.

७) या संस्थानी जीवनावश्यक वस्तु म्हणून कडधान्ये, डाळी, टिकावु वस्तु किरकोळ वस्तु यांचा पुरवठा जास्त प्रमाणात करण्याचा प्रयत्न केलेला नाही.

८) निपाणीतील ग्राहक सहकारी संस्था बाजारपेठेनुसार किंमत आकारण्याचे सक्रीय किंमत धोरण राबवणे पसंद करतात.

९) निपाणीच्या बाजारपेठेवर व्यापारी वर्गाचे वर्चस्व जास्त आहे व हे वर्चस्व कमी करण्याच्या दृष्टिने ग्राहक संस्थामार्फत आव्हानात्मक स्वरूपात प्रयत्न झालेले नाहीत.

१०) निपाणीतील ग्राहक संस्थाना वरील अनेक बाबतीत जे अपयश आले त्याची विविध कारणे आहेत. त्यापैकी राज्यसरकारच्या सहकार्याचा अभाव, त्रिसुत्री संघरचनेतील दोष, सहकारी भावनेचा अभाव, व्यवस्थापन कौशल्याचा अभाव, उधारी व्यवहारांची तरतुद नाही। असमाधानकारक सेवा, लहान आकारमान ही प्रमुख कारणे आहेत.

निपाणीतील प्राथमिक ग्राहक संस्थामधील हे दोष कमी करण्यासाठी संस्थानी आपल्या व्यवहारांची व्याप्ती वाढवून ग्राहकांना आकृष्ट करून घेण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. खाजगी व्यापा-याप्रमाणें उधारी व्यवहारांना मान्यता दिली पाहिजे. छोटया बचतीमार्फत भांडवल उभारणी करावी. तसेच सहकार सप्ताह, प्रदर्शन, चर्चासत्र याव्दारे ग्राहकांना माहिती व मार्गदर्शन देवून महिलांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. व हे सर्व करण्यासाठी प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांना

शासनानेही सहाय्य केले पाहिजे.

वरील उपायांचा योग्य प्रकारे अवलंब केला तर निपाणीतील ग्राहक सरकारी संस्था आपली उद्दिष्टे साध्य करण्यात चांगल्याप्रकारे यशस्वी होतील. तसेच त्यांचे आर्थिक व्यवहार वाढून प्रगती होवू शकेल. अन्यथा या ग्राहक सरकारी संस्थाना सार्वजनिक वितरण व्यवस्थतील प्रतिनिधी म्हणून अत्यल्प नफ्यावरच समाधान मानावे लागेल.

...

# संदर्भ ग्रंथ


1) Agrawal, A.N. : 'Indian Economy' Problem of Development and Planning, Vikas Publishing House, New Delhi,1985.

2) Amte, V.K.: "State Trading in Foodgrains", Shabhada Saraswat Publications, Pune,1980.

3) Burton, H. Marcus: " Modern Marketing", Random House, New Yark, 1975.

4) Bedi, R.D. : "Theory, History and Practice of Co-operation", Loyal Book Depot, Meerat, 1983.

5) Calvert, H. and Mukharji, B.B.: " The Law and Principle of Co-operation", Thacker Spink and Co., Culcutta, 1959.

6) चौगुले व्ही. टी., पठाण, के. जी. : "सहकाराची मुलतत्त्वे" कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, ३०, १९७१.

7) Cole, G.D.H.: "A Century of Co-operation", Gorge Allen and Unwin Ltd., London,1944.

8) Digby Margaret : "The World Co-operative Movement" Hutchinson University, Library, London, 1965.

9) Goyal, S.K.: "Consumer Co-operative Movement in India" Meenakshi, Prakashan, Meerat, 1972.

10) Hajela, T.N.: "Principles, Problems and Practice of Co-operation" Shivalal Agarawal and Company, Agra, 1984.


SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

11) Iyengar, A.S.K.: "A study in the Co-operative Movement in India", Current Book House, Bombay,1961.

12) International Labour Organization "Co-operation", A Workers Education Mannual" Impremeries Popularity Geneva.

13) जोशी, सी.के. : "सहकार", सी जमनादास आणि कंपनी पुणे, १९८३.

14) Kamat, G.S.: "New Dimensions of Co-operative Management", Himalaya Publishing House, Bombay,1978.

15) कामत, गों.स. : "सहकार, तत्व, व्यवहार व व्यवस्थापन" श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९७३.

16) Mathur, B.S.: "Co-operation in India", Sahity Bhavan, Agra, 1984.

17) Mehta,S.C.: "Consumer Co-operation in India", Atmaram and Sons, Delhi, 1964.

18) Memoria, C.B. & Sakesena, R.D.:"Co-operation in India", Kitab Mahal, Allhabad,1973.

19) Misra, S.K. and Puri, V.K.: "Indian Economy", Himalaya Publishing House, Bombay, Nagpur, 1983.

20) Saxena, A.K.: "Consumer Co-operatives in India and Western Countries" Chugh Publication, Allahabad,1988.

21) Rao, S.B.: "Distribution of Consumer Goods in Rural Areas", Puspak Prakashan, Pune,1979.

22) "Readings in Consumer Co-operation" International Co-operative Alliance, Asia Publishing House, Bombay,1972.

23) Redetzki Marian: "Economics of Consumer Co-operation" International Co-operative Alliance, Regional Office, New Delhi,1974.

24) "Research in Co-operation- A review" Vaikunt Mehta National Institution of Co-operative Management, Pune,1972.

25) सराफ, मोहन:"सहकार" सी जमनादास आणि कंपनी, पुणे,१९७९.

26) शिंदे आर्.के. :"भारतातील सहकारी चळवळ" राविल पब्लिकेशन, सातारा,१९८०.

27) Sherlekar, S.A.: "Trade Practice and Co-operation" Himalaya Publishing House, Bombay,1977.

28) Taimani, K.K.: "Studies in Retailing Consumers' Co-operation and Public distributive System", Harshad Prakashan, Puhe,1975.

29) Tyagi, R.B.: "Recent Trands in the Co-operative Movement in India", Asia Publishing House,Bombay,1968.


@@@